# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. १६३-२३** **दिनांक :- २०/०५/२०२३**

## गुंगीकारक औषधे देऊन रिक्षा चालकाचे अंगावरील दागिन्यांची लुटमार करणा-या आरोपीतांना अटक
## गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमीरा यांची कामगिरी.

----०००----

दिनांक १६.०३.२०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजण्याचे सुमारास फिर्यादी बाप्पा सिताराम मंदिरासमोर, शांतीनगर, मिरारोड पुर्व हे त्यांच्या रिक्षातून प्रवाशांना घेवून बोरीवली ते मिरारोड असा प्रवास करीत असताना सदर प्रवाशी आरोपीतांनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस फ्रुटीमध्ये कोणतेतरी गुंगीकारक औषध मिक्स करुन पिण्यास दिले व ते बेशुध्द झाल्यावर त्यांचे गळयातील सुमारे १० ग्रॅम वजनाची ५०,०००/- रुपये किंमतीची सोन्याची चैन काढुन फिर्यादी यांची फसवणुक केलेबाबत नयानगर पोलीस ठाणेत गुन्हा.रजि.नं. १६४/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३२८, ४२०, ४१४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमीरा यांनी नमुद गुन्हयाचा समांतर तपास करीत असताना गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे प्राप्त माहितीचे अनुषंगाने गुन्हे करणारे आरोपी १) सागर महेंद्रभाई पारेख, रा. सुरत, गुजरात २) संपतराज ऊर्फ संपो गेवेरचंद (गेवरचंद) जैन, रा. अहमदाबाद, गुजरात, ३) सुभाष अरविंद पाटील, रा. अहमदाबाद, गुजरात यांना ताब्यात घेवुन तपास केला असता त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना वर नमूद गुन्हयात अटक करण्यात आली व त्यांचेकडून गुन्हयात फसवणुक केलेला मुददेमाल हस्तगत केला आहे.

वर नमूद अटक आरोपीतांकडे अधिक तपास केला असता त्यांनी फ्रुटी व पेढयामधुन गुंगीकारक औषध देऊन काशिमीरा, खडकपाडा कल्याण, बांद्रा, आंबोली, मुंबई या ठिकाणी अशाच प्रकारचे गुन्हे केले असल्याचे तपासादरम्यान माहिती मिळाली. त्यांच्याकडून सदर गुन्हयात जबरीने व फसवणुक करुन नेलेला ०५,९०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन खालील नमूद गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.

## :- उघडकीस आणण्यात आलेले गुन्हे :-

| अ.क्र. | पोलीस ठाण्याचे नांव | गुन्हा रजी.नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १. | नयानगर पोलीस ठाणे | १६४/२०२३ | भा.दं.वि.सं. कलम ३२८,४२०,४१४,३४ |
| २. | काशिमीरा पोलीस ठाणे | १९९/२०२३ | भा.दं.वि.सं. कलम ३२८,३९२,३४ |
| ३. | काशिमीरा पोलीस ठाणे | २११/२०२३ | भा.दं.वि.सं. कलम-३२८,३९२,३४ |
| ४. | खडाकपाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर | १३७/२०२३ | भा.दं.वि.सं. कलम ३२८,४२०,३७९,३४ |
| ५. | खडाकपाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर | १३८/२०२३ | भा.दं.वि.सं. कलम ३२८,४२०,३७९,३४ |
| ६. | बांद्रा पोलीस ठाणे, मुंबई शहर | २८३/२०२३ | भा.दं.वि.सं. कलम ३२८,३९२,३४ |
| ७. | बांद्रा पोलीस ठाणे, मुंबई शहर | ५४५/२०२३ | भा.दं.वि.सं. कलम ३२८,३७९,३४ |
| ८. | आंबोली पो.ठाणे, मुंबई शहर | २८३/२०२३ | भा.दं.वि.सं. कलम ३२८,३९२ |

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमीराचे पो.नि. श्री .अविराज कुराडे, स.पो.नि. पुष्पराज सुर्वे, राजु तांबे, संदीप शिंदे, किशोर वाडीले, संजय पाटील, पो.हवा. अविनाश गर्जे, समीर यादव, विकास राजपुत, सचिन सावंत, प्रफुल्ल पाटील, विकास राजपूत, समीर यादव, प्रशांत विसपुते तसेच स.फौ. संतोष चव्हाण, नेमणुक सायबर गुन्हे शाखा यांनी केली आहे.

----ooo-----